## वडाची वाडी, पुणे येथील दोन वर्षाचे मुलाचे अपहरण करुन १० लाख रुपयाची खंडणी मागणा-या इसमाला गुन्हे शाखा, युनिट ३, पुणे यांचे कडून ताब्यात घेऊन गुन्हा उघड

दि. २३/०३/२०१९ रोजी रात्री ०८.३० वाजता चे सुमारास सोमनाथ तानाजी धनवडे रा. ग्रामपंचायतचे मागे, वडाची वाडी, पुणे यांचा मुलगा नामे पुष्करराज वय २ वर्ष हा घराचे बाहेर खेळत असताना अज्ञात व्यक्तीने पळवून नेऊन १० लाख रुपयाची खंडणी मागीतली होती. त्याबाबत कोंढवा पोलीस स्टेशन गुंन्हा रजि नंबर २८१/२०१९ भा.दं.वि.क ३६३, ३८५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखा, पुणे शहर कडील सर्व युनिट व खंडणी पथकाच्या मदतीने सदर मुलाची त्याच दिवशी सुखरुप सुटका करण्यात आली होती. परंतू त्या वेळी अपहरणकर्ता पळून गेला होता. सदर आरोपीचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट ३ कडील अधिकारी व कर्मचारी करीत होते. श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे १, पुणे शहर यांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे मांजरी परिसरातून अपहरणकर्त्यास दिनांक २८/०३/२०१९ रोजी ताब्यात घेण्यात आले. त्याचे कडे सखोल चौकशी केली असता. त्याचे नाव विकास रामभवन चौव्हाण वय २० वर्ष रा. खड्डा बुजुर्ग गांव ता. पडरौना जि.कुशीनगर, उत्तरप्रदेश असे असल्याचे व त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीने गुन्हयाची कबूली दिल्याने त्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करुन कोंढवा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात येत आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री. प्रदीप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, श्री. शिरीष सरदेशपांडे , पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे १,पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे श्री. दिपक निकम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संदीप देशमाने सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उप-निरीक्षक श्री.अजय म्हेत्रे, श्री. संजय गायकवाड, श्री. किरण अडागळे तसेच स.पो.फौ. दत्तात्रय गरुड, अनिल शिंदे, किशोर शिंदे, दिपक मते, प्रविण तापकीर, मेहबुब मोकाशी, रामदास गोणते, संतोष क्षीरसागर, शकील शेख, मच्छिंद्र वाळके, गजानन गानबोटे, विल्सन डिसोझा, संदीप राठोड, अतुल साठे,संदीप तळेकर, सचिन गायकवाड, कैलास साळुंके, कल्पेश बनसोडे,सागर तोरडमल,या पथकाने केलेली आहे.

(दिपक निकम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, युनिट ३, पुणे शहर

